REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# श्री. ग. रा. वडपल्लीवार यांच्या नाटकातील झाडीपट्टी संस्कृती दर्शन

**डॉ. श्याम मोहरकर[१] , श्री. जनबंधू मेश्राम[२]**
१प्राचार्य , कला-वाणिज्य महाविद्यालय, गोंडपिपरी जि. चंद्रपूर.
२सहयोगी प्राध्यापक , सर्वोदय महाविद्यालय, सिंदेवाही जि. चंद्रपूर.

**प्रास्ताविक :**



श्री. गणपती रामदास वडपल्लीवार हे महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त झाडीपट्टीतील जेष्ठ कलावंत आहेत. तसेच ते नाट्य लेखकही आहेत. 'न्याय उलटा नियतीचा', 'नामर्द', 'इन्कलॅाब जिंदाबाद', 'व्यथा ही नरमादीची', 'पांढऱ्या दुधाची काळी कथा' ही त्यांची अप्रकाशित तर 'मातामाईचा मुंज्या' आणि 'झाडपी माणसं' ही त्यांची प्रकाशित नाटके आहेत. 'मातामाईचा मुंज्या' हे त्यांचे पहिले नाटक महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि संस्कृती विभागाच्या अनुदानातून १९९३ साली प्रकाशित झाले. या नाटकाला ८ व्या झाडीबोली साहित्य परिषदेच्या सम्मेलनात २७ जानेवारी २००१ ला उत्कृष्ट नाट्यलेखनाचा पुरस्कारही प्राप्त झाला. त्यांचे दुसरे प्रकाशित नाटक 'झाडपी माणसं' हे विद्याविकास पब्लिशर्स प्रा. लि. नागपूर या प्रकाशनाने २६ जानेवारी २०१५ ला प्रकाशित केले. या त्यांच्या दोन्ही प्रकाशित नाटकात झाडीपट्टीतील संस्कृती दर्शन कशाप्रकारे घडते याचा वेध घेण्याचा प्रयत्न या लेखात केला गेला आहे.

## १. 'मातामाईचा मुंज्या' या नाटकातील झाडीपट्टी संस्कृती दर्शन :

झाडीपट्टीतील ग्रामीण आदिवासी भागातील अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि जातिप्रथा हा या नाटकाचा मुख्य विषय आहे. आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्व काळापासून जातिभेद निर्मुलनाचे शासनाचे प्रयत्न सुरू असले तरी २० व्या शतकाच्या आरंभापर्यंत तरी समाधानकारक परिवर्तन घडून आल्याची चिन्हे ग्रामीण परिसरातील जनमानसात दिसून येत नाहीत. अंधश्रध्दा, बुवाबाजी आणि श्रेष्ठ - कनिष्ठ या भावनेने जातिप्रथेला खतपाणी दिले जाते. समाजात सुरू असलेल्या या अनिष्ट रूढी परंपरा आणि माणसामाणसात दुरावा निर्माण करणारी जातिभेदाची समस्या दूर करण्यासाठी एक उपाय म्हणून या नाटकात नाटककाराने आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला आहे.

झाडीपट्टीतील ग्रामीण भागात मातामाईचे पूजन करण्याची परंपरा आहे. ग्रामीण लोकांच्या जीवनात उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्येचे निराकरण मातामाई करते अशी येथील ग्रामीणांची श्रद्धा आहे. याचे दर्शन सदर नाटकात घडते. या नाटकाच्या पहिल्याच प्रवेशात दर्शनी पडदा उघडतो तेव्हा "रंगमंचावर जंगलाच्या पडद्यासमोर एक मंडप टाकलेला आहे. त्यावर कडुनिंबाच्या फांद्या टाकलेल्या आहेत. मंडपात शेवटी लाकडी मातामाईच्या ८-१० मूर्त्या उभ्या ठेवल्या आहेत. मुर्त्यांना कुंकू व हळदीचे पट्टे कपाळावर लावले आहेत. दोन्ही बाजूला लाकडी समया असून त्यात ज्योती जळत आहेत"[१] येथे मातामाईचे सामुदायिक पूजन होणार असते. काही मुलींच्या डोक्यावर पाण्याने भरलेल्या घागरी असून त्यात कडूनिंबाच्या डहाळ्या टाकलेल्या आहेत. मातामाईची भक्तीन देवीचे वारे अंगात शिरल्यामुळे नाचत आहे. सोबत असलेल्या काही मंडळीजवळ बकरे व कोंबड्या आहेत.

दृष्ट लागणे आणि ती मीठमिरच्या ओवाळून काढणे ही सुद्धा ग्रामीण भागातील एक परंपरा आहे. याचेही दर्शन या नाटकातील गोविंदा माली या पात्राच्या संवादातून दिसून येते. गोविंदा मुंगसाजी वैद्याला उद्देशून म्हणतो, "हजरजबाबी म्हणून आमच्या जातीचा ठेकापत्रच मंजूर केला आहे ब्रम्हदेवाने, म्हणून तुमच्या सारख्याच्या पोटात दुखायला लागलं असेल तर मीठ-मिरच्या ओवाळून दृष्ट काढून घ्या हवं तर."[२] मातामाईवर ग्रामीण लोकांची फारच श्रद्धा ! ग्रामीण भागातील गावपाटील म्हणतो, "वैद्यबोवा, आमच्या तुमच्यावर पुरा - पुरा भरोसा आहे. तुमची वैद्यकी, देवाऱ्याची

पुंजा आन् गोदाबाईची देवी आमच्या संग राहिल्यावर गावाच्या केसालं धक्का नाही लागावाचा"[३] गावच्या पाटलाचाच असा अंधविश्वास तर सर्वसामान्यांची काय कथा? हिंदू दैवतांच्या मंदिरात अस्पृश्यांनी प्रवेश करू नये; नाहीतर फार अनर्थ ओढवतो अशी ही अंधश्रद्धा गावगावड्यात होती. त्याचेही दर्शन नाटककाराने या नाटकात घडविले आहे. या नाटकातील मुंगसाजी वैद्यराज पाटलाला सांगतो की, आज जर या मंडळीच्या जमावानी देवधर्मात हस्तक्षेप केला तर माताताईची वक्रदृष्टी फिरेल आपल्या गावावर. पूर्वी महामारीची साथ म्हणत होतो ती अवस्था यापुढे येईल. या मुंगसाजीच्या बोलण्यावर एकदम चिडून पाटील म्हणतो, "आता जीवाची पर्व नसं मलं ! मायमाजीसाठी माजा मुर्दा या गावात पडला तरी बरा पण या लोकाईलं देवालं हात नाही लावू देवाचा. या टोळभैरव लोकांची करणी आन् गावालं भरनी का म्हणून ?"[४]

ग्रामीण भागात देवी अंगात आणण्याची प्रथा तुरळक प्रमाणात दिसून येते. गोदाबाईच्या अंगात देवी संचारते. तिचे पूजन करण्याकरीता अस्पृश्य आले आहेत असा मसा पाटलाचा समज होतो. तो जोंधळू चांभाराला देवीला स्पर्श करण्यास मज्जाव करतो. तेव्हा जोंधळू बाणेदारपणे उत्तर देतो, "अंधारात अनेकांच्या घाणेरड्या स्पर्शाने अपवित्र झालेल्या हिच्या देहाला आम्ही स्पर्श करणारच नाही. आणि असला स्पर्श आम्हाला नको आहे. आम्हाला हवा आहे मानवतेचा स्पर्श आणि समाजवादाचा हर्ष."[५] अस्पृश्यांनाही आता त्यांच्या हक्काची जाणीव झाल्याची सूचनाच जणू नाटककाराने यातून दिली असून अस्पृश्यांचा संघर्ष हा नव्या मानवतावादी समाजनिर्मितीचा संघर्ष आहे हे सूचित केले आहे.

झाडीपट्टीतील लोकसंस्कृतीचे दर्शन सर्वांना घडावे याकरीता ग्रामीण भागातील व्यवसायाशी निगडीत पात्रांची योजना या नाटकात नाटककाराने केलेली आहे. या नाटकातील प्रमुख पात्र असलेले मसा पाटील हे अस्सल झाडीपट्टीतील पाटील आहेत. त्यांची भाषासुद्धा झाडीबोली आहे. त्यांचा घरगडी असलेला कवळू हा सुद्धा झाडीपट्टीच्या बोलीतच बोलतो. गावचा देव्हारीपणा सांभाळणारा देवारी हा सुद्धा अस्सल झाडीबोलीतच भाष्य करतो. खेड्यापाड्यातील लोकांचे केशकर्तन करणारा नाव्हीही या नाटकात आहे. तो मात्र झाडीबोलीत न बोलता मराठीत बोलतो. या प्रत्येक पात्राच्या वर्तनातून आणि संवादातून झाडीपट्टीतील ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडते. आणि व्यवसायावरून जातीपातीची उतरंड कशी निर्माण झाली हे सुद्धा पहायला लागते.

या नाटकात ज्या म्हणी आहेत त्यातूनही झाडीपट्टीतील बोलीचेच दर्शन घडते. कुठलीही संस्कृती समजण्यासाठी आधी त्या संस्कृतीत बोलली जाणारी भाषा समजावी लागते. 'सप्पा तेलरांधा बिघडला', 'झुलीर पडून खाना खराब झाला', 'रिकामी बाई न् धंदा नसं काई !', 'ज्या गावी भरला दरा आन् तोच गाव माझा बरा', 'घरची करते देवा देवा आन् बाहेरचीलं चोरी शिवा', 'बाप दाव नाहीतर सराद कर', 'येरे गोट्या पड पाया', 'कोणी नाही हटके आन् आपूनच मटके ;', 'एक पूत आन् हेलभर मूत' अशा कितीतरी म्हणी या नाटकात आहेत, ज्या नाटककाराने येथील ग्रामीण संस्कृतीतून घेतल्या आहेत.

जातीयता, अंधश्रद्धा आणि अस्पृश्योद्धार या समस्येवर लिहिलेले हे नाटक असल्यामुळे ते फारच परिणामकारक ठरले आहे. दलित्तेतर समाजातील पाटील हा परंपरा टिकवून ठेवण्याकरीता धडपडणारा; तर त्यांचाच मुलगा शिक्षणरूपी वाघीणीचे दुध प्राशन करून गुरगुरणारा आहे. वडील परंपरा जपणारा तर मुलगा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर पी.एच.डी. मिळवून त्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी झगडणारा असल्यामुळे या नाटकातील संघर्षही नाटकाला उंचीवर नेणारा आहे. शिवाय गाव खेड्यात येऊन राहिलेले परके लोक आपल्या स्वार्थापायी गाव नासविण्यात व गावात विषमता निर्माण करण्यास कसे कारणीभूत होतात याचेही दर्शन नाटककारांनी या नाटकात घडविले आहे.

### २. 'झाडपी माणसं'

झाडीपट्टीतील लोकश्रद्धा लोकाचार, रूढी-परंपरा आणि सांस्कृतिक सण उत्सवांचे दर्शन घडविणारे श्री. ग.रा. वडपल्लीवार यांचे हे दुसरे प्रकाशित नाटक आहे. राजकारण हा विषय शहरापासून तर खेड्यातील लोकांपर्यंत पोहचला आहे. राजकारण करून बाहेरून आलेल्या उपऱ्या समाजकंटकांनी झाडीपट्टीतील साध्या भोळ्या, श्रद्धाळू, घरंदाज पाटलाचा कसा गैरफायदा घेतला याचे चित्रण या नाटकात नाटककाराने केले आहे. या नाटकात रेखाटलेले प्रसंगही झाडीपट्टीतील जीवन दर्शन आणि सांस्कृतिक दर्शन घडविण्यास समर्थ ठरले आहेत. याशिवाय नक्षलवाद आणि दारूच्या व्यसनाने झालेली अधोगती, पाटिलकीचा लटका बडेजाव व त्यातून होणारी धुळधाण याचे वास्तवदर्शी चित्रण या नाटकात केले आहे.

गावखेड्यातील संस्कृती ही मुख्यतः कृषिसंस्कृती आहे. येथे दोन वर्गात ही संस्कृती विभागलेली आहे. एक वर्ग येथील शेतकऱ्यांचा आहे, तर दुसरा वर्ग शेतीत काम करणाऱ्या मजूरांचा आहे. ज्यांच्याकडे भरपूर शेती आहे त्यांना 'पाटील किंवा सावकार' म्हणतात ; तर ज्यांच्याकडे मुळीच शेती नाही त्यांना 'ठलवा' म्हणण्याची प्रथा झाडीपट्टीत आहे.

**'झाडपी माणसं' या नाटकातील झाडीपट्टी संस्कृती दर्शन :**

झाडीपट्टीतील मुख्य पीक धानाचे. धानाचे पऱ्हे टाकणे, रोवणी करणे, निंदणे, धान कापणे व चुरणे इत्यादींकरीता शेतकऱ्यांना फारच लगबग असते. या नाटकाच्या सुरूवातीलाच नाटककाराने रोवण्याचा उल्लेख केला आहे. या नाटकातील झिंगरू पाटलाचा घरगडी त्यांना सांगतो "गाव खारी- गाव खारी म्हणून लोक वानवतेत दंडालं. आना रोवना पाहून हासतेत. बरोबरीचं लोकाईचं रोवणं हिरवं पडून लहऱ्या मारत आहेत... जीवती गेली, सरावण लागला तरी रोवाणा नाही सरे, म्हंजे काहो?"[६] झाडीपट्टीत पूर्वीच्या काळी 'आंबील' करायचे. पण आता आंबिलीची जागा चहाने घेतली. याचाही उल्लेख या नाटकात "झाडीची आंबील गेली आना चाय पुडा आला."[७] या तुक्या गायक्याच्या वाक्याने केला आहे. झाडीपट्टीची माणसं निर्व्याज प्रेमळ आहेत. पोटात असेत तेच नेमके त्यांच्या ओठात येते. हातचे राखून बोलण्याची त्यांची सवय नाही.

झाडीपट्टीतील ग्रामीण भागात देवदेवस्कीवर फारच विश्वास असल्याचेही नाटककाराने या नाटकात नमूद केले आहे. या नाटकातील गोदाबाई या पात्राच्या अंगात गंगा माय येते. अंधश्रद्धाळू लोक या देवीकडे जाऊन आपल्या समस्या तिला सांगतात, आणि ती अंगारा देऊन समस्या दूर करते अशी अंधश्रद्धा केवळ झाडीपट्टीतच नव्हे तर सर्वत्रच दिसून येते.

झाडीपट्टीतील पाटलांची संस्कृती आणि इतर प्रदेशातील संस्कृती यामधील फरकही या नाटकात नाटककाराने दाखविलेला आहे. झाडीपट्टीतील पाटील नोकरांनाही आपल्या पंक्तीला जेवायला बसवितात. हे आंध्रातून दारूचा धंदा करण्यासाठी आलेल्या नरसन्नाला आवडत नाही. पण या नाटकातील झिंगरू पाटलाची सून आरती त्याला आपल्या संस्कृतीबद्दल सांगताना म्हणते, "आमच्याकडे तुमच्यासारखा भेदभाव नाही. एकाच पंक्तीत नोकरांसह जेवण करणारी आम्ही झाडपी माणसं आहोत."[८] या आरतीच्या संवादातून झाडीपट्टीतील झाडपी माणसांच्या जीवनातील मानवतेचे दर्शन यातून घडते.

श्रावण महिण्यातील मंगळवारी शेतीची कामे बंद ठेवण्याचा रिवाज येथील कृषिसंस्कृतीत आहे. बाहेरील प्रदेशामधून केवळ व्यापार करण्यासाठी आलेल्यांना हा रिवाज म्हणजे विचित्रपणा वाटतो. या नाटकातील नरसन्ना बाबुराव पाटलाला म्हणतो, "पटेल साब, तुमचे झाडीपट्टीत अजब रिवाज असतो मे महिन्यात मंगलवारी खेतीचा काम बंद ठेवतो, तो नुकसान कोणाचा होतो? मालकाचीच ना"[९] यावर बाबुराव पाटील नरसन्नाला आपल्या येथील रिवाजांबद्दल सांगताना म्हणतो, "खरं आहे तुमचं! वैशिष्ट्यांशिवाय प्रसिध्दीच मिळत नाही. मग ती एखाद्या विभागाबद्दल किंवा व्यक्तिबद्दल असो ही आहे आमची झाडीपट्टी. येथील रिवाज इतरांपेक्षा वेगहे आहेत. येथे किंमत आहे माणुसकीला, पैशाला नाही... अण्णा, श्रावण महिन्यातील दर मंगळवारला काम बंद असल्यामुळे तुमच्या म्हणण्याप्रमाणे मालकाची नुकसान होत असेल परंतु त्यात साठवलेली आहे ईश्वरभक्ती, अभंग एकता, जनावरांना विश्राम आणि नोकरांना आराम"[१०] या बाबुराव पाटलाच्या बोलण्यातून झाडीपट्टीत जनावरांपासून तर नोकरांपर्यंत सर्वांची किती काळजी घेतली जाते हे सूचित होते.

कृषिसंस्कृतीत बैलाला देव माणून त्याची पूजा करण्याची प्रथा आहे. यालाच 'बैल पोळा' असे म्हणतात. पोळ्याच्या दिवशी दरवाज्यावर पळसाच्या (डारा) डहाळ्या ठेवतात. बैलांना सजवून त्यांची शिवमंदिरा समोरील आखरावर नेऊन पूजा केली जाते. याचेही चित्रण या नाटकात आहे. पोळ्याचा तोरण तोडण्याचा मान गाव पाटलाचा असतो. सर्व गावकरी खेळीमेळीने पोळ्यात सहभागी होतात. झाडीपट्टीतील या सणाबाबत या नाटकातील बाबुराव पाटील दगडू पाटलाला सांगतो, "पाटील, पोळ्यात एकमेकांना नमस्कार करण्याची पद्धत आहे. वैरीही आपल्या शत्रूला देखील अक्षदा लावून नमस्कार करतो. उद्देश असतो क्षणकाल वैरत्त्व विसरण्याचा."[११] क्षणभर आपापसातील वैरत्त्व विसरून बैलांची पुजा केली जाते आणि मग झडत्यांचा मुकाबला सुरू होतो.

झाडपी माणसं हे संगीत नाटक असले तरी यामध्ये नाट्यगीतांच्या ऐवजी झाडीपट्टीतील पारंपरिक लोकगीतांचा वापर नाटककाराने केला आहे. कृषिजीवनातील रोवणागीते, मातामाईची गाणी, झाडीपट्टीतील विवाह गीते, पोळ्याच्या झडत्या, झुलवे इत्यादी गीते या नाटकात आहेत.

उदा.- माता व माईचा - सोन्याचा खराटा
झाडी चारही वाटा व मातामाय !! १ !!

हे मातामाईचे लोकगीत,

'भूईपायी-भूईपाई सवगे चिकणल्या भूई !
भला रोवणा रोवलु नागोबा, तुज्या नांगा भुई!',

हे रोवणा गीत, तर -

'फाला तो फाला गड्या हो -अगा सुताचा फाला !
गांधी दुनियेचा पालनहारा गा गांधी दुनियेचा पालनहारा'

हा झुलवा,

'अरे अरे वासरा गाईच्या लेकरा-ओढलास नांगर धरतीच्या पाखरा.
तु नांगरली धरती - त्यात आम्ही पेरले माणिक मोती !!
त्याच मोत्याचा स्वयंपाक केला - आज बसू राज्या या हो भोजनाला !!,
एक नमन पवळा-पार्वती हर हर महादेव'

या सारख्या झडत्यांमधून झाडीपट्टीची लोकसंस्कृती साक्षात उभी राहताना दिसते. या नाटकात नाटककाराने वापरलेली विवाहविषयक लोकगीते तर कमालीची विलोभनीय आहेत.

'नवरदेवाजी वरू माय, पिवळा पितांबर नेसली,
पिवळा पिंताबर नेसली जाऊन पाटावर बसली !!',

हे विवाहविधीतील नवरदेवला दुध पाजण्याचे गीत तर साक्षात झाडीपट्टीची विवाहसंस्कृती डोळ्यासमोर उभी करते.

याशिवाय झाडीपट्टीतील झाडपी शब्द व म्हणी आदिवासींची गोंडी बोली इत्यादीचा वापर नाटककाराने या नाटकात केला आहे. झ ाडीपट्टीच्या लोकजीवनातील संस्कृती आणि लोकांच्या समस्यांचे चित्रण केले असल्यामुळे झाडीपट्टीतील रसिकांना हे नाटक खास झ ाडीपट्टीचे वाटणे साहजिकच आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. ग.रा. वडपल्लीवार 'मातामाईचा मुंज्या', ग.म.भ.न. प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९३, पृ. १
२. उनि, 'मातामाईचा मुंज्या', पृ. ३
३. तत्रैव, 'मातामाईचा मुंज्या', पृ. ४
४. तत्रैव, 'मातामाईचा मुंज्या', पृ. ९
५. तत्रैव, 'मातामाईचा मुंज्या', पृ. १३
६. ग.रा. वडपल्लीवार 'झाडपी माणसं', विद्या विकास पब्लिशर्स प्रा.लि. नागपूर, प्रथमावृत्ती जानेवारी २०१५, पृ. २०
७. उनि, 'मातामाईचा मुंज्या', पृ. २३
८. तत्रैव, 'मातामाईचा मुंज्या', पृ. ४९
९. तत्रैव, 'मातामाईचा मुंज्या', पृ. ५७
१०. तत्रैव, 'मातामाईचा मुंज्या', पृ. ५७
११. तत्रैव, 'मातामाईचा मुंज्या', पृ. १११